पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

मा. ड प्रभाग समिती

कार्यपत्रिका क्रमांक १

सभावृत्तांत

दिनांक – १०/०४/२०१५ वेळ : दुपारी २ .२० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ड प्रभाग समितीची मा. सभापती निवडीची सभा शुक्रवार दिनांक १०/०४/२०१५ रोजी दुपारी २.२० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकर रामचंद्र पवळे सभागृहात मा. श्री. ओमप्रकाश बकोरिया, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त,पुणे महानगरपालिका पुणे यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. टाक अरुण मदन
२. मा. वाघेरे सुनिता राजेश
३. मा. आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किंमतराम
४. मा. वाघेरे प्रभाकर नामदेव
५. मा. पाडाळे निता विलास
६. मा. तापकीर अनिता मच्छिंद्र
७. मा.थोपटे कैलासभाऊ गबाजी
८. मा. नांदगुडे विलास एकनाथ
९. मा. चोंधे आरती सुरेश
१०.मा. काटे बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम
११. मा.काटे शितल विठठल उर्फ नाना
१२. मा. बोकड रामदास गेणभाऊ
१३. मा. जवळकर वैशाली राहुल
१४. मा. धराडे शकुंतला भाऊसाहेब

याशिवाय मा. चंद्रकांत खोसे - क्षेत्रिय अधिकारी, मा.मनोज लोणकर – सभा सचिव तथा प्रशासन अधिकारी, ड क्षेत्रिय कार्यालय हे उपस्थित होते.

-------

| | |
|---|---|
| अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त :-<br>पुणे महानगरपालिका<br>**(पीठासीन अधिकारी)** | सन्मा. सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत ड प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा. विभागीय आयुक्त यांनी सभेचा पीठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. मा. ड प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.<br><br>**सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सूचना करतो.** |
| **मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव ( सभाशाखा)** | मा. ड प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणुक करणेकामी एकूण ०३ नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार, त्यांचे सूचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे |

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. टाक अरूण मदन, सुभाषनगर, रिव्हर रोड, झुलेलाल मंदिराजवळ, पिंपरी कँप, पिंपरी, पुणे – ४११ ०१७ | श्रीम. तापकीर अनिता मच्छिंद्र | श्री. वाघेरे प्रभाकर नामदेव |
| २ | श्री. टाक अरूण मदन, सुभाषनगर, रिव्हर रोड, झुलेलाल मंदिराजवळ, पिंपरी कँप, पिंपरी , पुणे – ४११ ०१७ | श्रीमती धराडे शकुंतला भाऊसाहेब | श्री. थोपटे कैलासभाऊ गबाजी |
| ३ | सौ.चोंधे आरती सुरेश, घर नं. १७१, विशालनगर, पिंपळे निलख, पुणे – ४११ ०२७ | श्री. नढे विनोद जयवंत | सौ. काळे विमल रमेश |

**मा. पीठासीन अधिकारी :-** मा. ड प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त दोन उमेदवारांच्या एकूण तीन नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली असुन ती तीन नामनिर्देशन पत्रे वैध ठरलेली आहेत. त्यामध्ये मा. ड प्रभाग समिती सभापती पदाची

निवडणुक लढविणारे सौ. चोंधे आरती सुरेश व  श्री. टाक अरुण मदन हे दोन रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा. पीठासीन अधिकारी यांचेकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल.

(पीठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेला दुपारी २ .२२ वा. ते २.३७ हा १५मिनिटांचा कालावधी संपला. )

उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीमध्ये मा. ड प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे सौ. चोंधे आरती सुरेश यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या वेळेमध्ये उमेदवारी अर्ज मागे घेतला असल्याने श्री. टाक अरुण मदन  हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८

मा. ड प्रभाग समिती

---

ठराव क्रमांक १ विषय क्रमांक १

दिनांक १०/०४/२०१५ विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेकरीता १) सौ. चोंधे आरती सुरेश व २) श्री. टाक अरुण मदन या दोन उमेदवारांपैकी सौ. चोंधे आरती सुरेश यांनी ०१ व श्री. टाक अरुण मदन यांनी ०२ या प्रमाणे एकूण तीन नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल केलेली असुन त्यापैकी ०३ नामनिर्देशन पत्रे वैध ठरलेली आहेत. त्यामधील एकूण दोन उमेदवारांपैकी सौ. चोंधे आरती सुरेश यांनी त्यांची उमेदवारी रितसर मागे घेतली असल्याने ड प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेसाठी श्री. टाक अरुण मदन हे एकच उमेदवार असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ड प्रभाग समिती सभापती म्हणुन रितसर वैधरित्या निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

यानंतर पीठासीन अधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-

**( ओमप्रकाश बकोरिया )**

**पीठासीन अधिकारी** तथा

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त,

पुणे महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

ड क्षेत्रिय कार्यालय, रहाटणी – १७

क्र.ड/१३/कावि/ ३७ /२०१५

दि . १०/०४/२०१५ सही/-

**प्रशासन अधिकारी तथा सचिव,**

**ड प्रभाग समिती**

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे

पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८

मा. ड प्रभाग समिती

ठराव क्रमांक १ विषय क्रमांक १

दिनांक १०/०४/२०१५ विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेकरीता १) सौ. चोंधे आरती सुरेश व २) श्री.अरुण मदन या दोन उमेदवारांपैकी सौ. चोंधे आरती सुरेश यांनी ०१ व श्री. टाक अरुण मदन यांनी ०२ या प्रमाणे एकूण ०३ नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल केलेली असुन त्यापैकी ०३ वैध ठरलेली आहेत. त्यामधील एकूण दोन उमेदवारांपैकी सौ. चोंधे आरती सुरेश यांनी त्यांची उमेदवारी रितसर मागे घेतली असल्याने ड प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेसाठी श्री. टाक अरुण मदन हे एकच उमेदवार असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ड प्रभाग समिती सभापती म्हणुन रितसर वैधरित्या निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**सही/-**

**( ओमप्रकाश बकोरिया )**

**पीठासीन अधिकारी** तथा

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त,

पुणे महानगरपालिका